वर्ष- ११ | अंक- ४९ | मुंबई, मंगळवार, २१ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २०२५ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

PG|2

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

दिवाळीत लक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी वास्तुनुसार दारावर लावा तोरण

3 → कृतघ्न आणि असंवेदनशील महाराष्ट्र

मिठी नदी घोटाळा : सीईओ केतन कदमला ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

मागील २२ महिन्यांमध्ये फटाक्यांमुळे १८२ आगीच्या दुघर्टना..



मुंबई : मुंबईत यंदा दीपावलीच्या सणा निमित्त केल्या जाणाऱ्या फटाक्यांच्या आतषबाजींमुळे आगीच्या दुघर्टना घडण्याची शक्यता लक्षात घेता अग्निशमन दलाच्या माध्यमातून सुरक्षेच्या दृष्टीकोनातून फटाके फोडण्यासाठी काय काळजी घेतली जावी याबाबतची मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. तरीही फटाके फोडताना नागरिकांकडून काळजी घेतली जात नसून रविवारी मध्य रात्री रॉकेटमुळे शिंपोली मेगा पार्टी हॉलसमोरील मॉर्डन ग्लास हाऊस येथे आग लागण्याची दुघर्टना घडली. यात कुठलीही जिवित हानी झाली नसली तरी मोठ्याप्रमाणात मालमत्तेचे नुकसान झाले आहे. त्यामुळे दिवाळी सणाच्या काळात सर्वाधित आगीच्या घटना घडत असून मागील २२ महिन्यांमध्ये तब्बल १८२ अशाप्रकारच्य घटना घडल्याची आकडेवारी समोर येत आहे. बोरीवली शिंपोली येथे एका फटाक्याचे रॉकेट जवळच्या दुकानाजवळ पडले आणि यामुळे लागलेल्या आगीमध्ये चार दुकानांचे नुकसान झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने आग विझवण्याचे कार्य हाती घेतल्याने ही आग पुढेपर्यंत पसरली गेली नाही. मुंबई अग्निशमन दल, आणि पोलिस विभागाच्या तत्परतेमुळे आणि समन्वयामुळे आग शेजारच्या द्वारका हॉटेलपर्यंत पोहोचण्यापूर्वीच आटोक्यात आणण्यात आली,असे स्थानिक भाजपाचे माजी नगरसेवक शिवानंद शेट्टी यांनी सांगितले. मुंबईत दिवाळीच्या सणामध्ये फटाक्यांची आतषबाजी केली जात असल्याने उडणाऱ्या फटाक्यांच्या सुरक्षिततेचे पालन करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे बनवली आहे. त्यामुळे फटाक्यातील रॉकेट फोडताना रॉकेटसाठी स्थिर आणि सरळ बाटली किंवा पीव्हीसी पाईपच्या माध्यमातून योग्य स्टँड वापरले जावे अशाप्रकारच्या सूचना केल्या आहेत. विशेष म्हणजे या दिवाळीचा सणामध्ये सोमवारपर्यंत फटाक्यांमुळे आगी लागण्याच्या दोन घटना घडल्या आहेत. मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात २७ फटाक्यांमुळे आगी लागण्याच्या घटना घडल्या होत्या, तर नोव्हेंबर २०२४ रोजी ११३ दुघर्टना घडल्या होत्य. त्यामुळे मागील २२ महिन्यांमध्ये फटाक्यांमुळे आगी लागण्याच्या तब्बल १८२ घटना घडल्या आहेत. मुंबई अग्निशमन दलाचे प्रमुख अधिकारी रविंद्र अंबुलगेकर यांनी यंदाची दिवाळी अग्नि सुरक्षेच्या दृष्टीकोनातून चांगली जावी याकरता नागरिकांनी उडणाऱ्या फटाक्यांबाबत अग्निशमन दलाने दिलेल्या सुचनांचे पालन करावे असे आवाहन केले आहे. विशेष म्हणजे लहान मुलांनी एकट्याने फटाके फोडण्याऐवजी प्रौढ व्यक्ती सोबत असतानाच फटाके फोडावे असे स्पष्ट केले आहे. फटाके फोडण्यासंदर्भात अग्निशमन दलाने जाहीर केलेल्या सूचना

उडणारे फटाके पेटवण्यापूर्वी...

प्रौढांची देखरेख असावी - लहान मुलांना कधीही एकटे फटाके उडवू देऊ नका.

मोकळी जागा निवडा - घर, झाडे, वीजेच्या तारा आणि ज्वलनशील वस्तूं पासून दूर असलेली.

वाऱ्याची दिशा पहा - वारा जोरात असल्यास फटाके उडवू नका, ते चुकीच्या दिशेने जाऊ शकतात.

योग्य स्टैंड वापरा- रॉकेटसाठी स्थिर आणि सरळ बाटली किंवा पीव्हीसी पाईप वापरा.

सुरक्षित अंतर ठेवा - फटाके उडवण्याच्या जागेपासून सर्वांनी सुरक्षित अंतर ठेवा.


फटाके पेटवताना...

सुरक्षित कपडे घालाः सूती कपडे, बंद बूट आणि सुरक्षात्मक चष्मा वापरा.

लांब अगरबत्ती / मेणबत्ती वापरा : थेट माचिस किंवा लायटर वापरू नका.

एकावेळी एकच फटाका पेटवाः घाई नको, संयम ठेवा.

कधीही वाकून फटाका पेटवू नकाः रॉकेट पेटवताना नेहमी सरळ उभे राहा. काही गडबड झाल्यास काय करावे ? फसलेला फटाका परत पेटवू नकाः तो १५ मिनिटे तसाच सोडा आणि नंतर पाण्यात टाका. पाणी व वाळू जवळ ठेवाः आग लागल्यास पाणी, वाळू किंवा फायर एक्स्टींग्विशर वापरून त्वरित आग विझवा.



मुंबईतील व्यावसायिकाने ५८ कोटी गमावले

मुंबई। सायबर गुन्हेगारीत दिवसेंदिवस कोटी कोटी रुपयांची उड्डाणे सुरू आहेत. शेअर मार्केटमध्ये व्यवहार करणाऱ्या एका ७२ वर्षीय व्यावसायिकाला डिजिटल अटकेत ठेवून तब्बल ५८ कोटी रुपये उकळण्यात आले. या प्रकरणी महाराष्ट्र सायबर पोलिसांनी तिघांना अटक केली असून त्यांच्या बँक खात्यामध्ये या गुन्ह्यातील प्रत्येकी २५ लाख रुपये वळते करण्यात आले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ ऑगस्ट रोजी सुब्रमण्यम आणि करण शर्मा अशी नावे सांगणाऱ्या दोघांनी वृद्धाला पहिल्यांदा संपर्क साधला. सीबीआय, ईडी यासारख्या तपास यंत्रणांचे अधिकारी असल्याचे त्यांनी भासविले. त्यानंतर दोघांनी त्यांच्या इतर साथीदारांच्या मदतीने वृद्ध व्यावसायिकाची चौकशी करण्यास सुरुवात केली. व्यावसायिक आणि त्याच्या पत्नीचा मनी लॉंडरिंगच्या गुन्ह्यात सहभाग आढळल्याची कागदपत्रे पाठविण्यात आली. आपल्या नावाची कागदपत्रे पाहून व्यावसायिक आणि त्याची पत्नी प्रचंड घाबरले. याबाबत कुणालाही काहीच सांगू नका असे बजावत त्यांनी व्हिडीओ कॉल सुरू केले.

'बदला' घेण्यासाठी महिलेने मुंबई लोकल ट्रेनच्या मोटरमनवर केली दगडफेक?



सध्या सोशल मीडियावर चचेर्चा विषय ठरतोय. ट्रेन 'मिस' झाल्याचा बदला घेण्यासाठी महिलेने दगडफेक केली अशा मजेशीर कमेंट्सही अनेक नेटकरी करीत आहेत. जाणून घेऊया ही घटना खरंच मुंबईत घडली आहे का आणि सत्य काय?

व्हायरल क्लिपमध्ये ती महिला हातात मोठा दगड धरून विरुद्ध दिशेने येणाऱ्या लोकलच्या मोटरमनच्या केबिनवर फेकताना दिसते. दगडफेकीनंतर ती शिवीगाळ करताना, जोरात ओरडतानाही दिसतेय, मात्र तिचे बोलणे स्पष्ट ऐकू येत नाही. या धक्कादायक प्रकारामुळे सोशल मीडियावर संतापाची लाट उसळली आणि अनेकांनी मुंबई पोलिसांना टॅग करून कठोर कारवाईची मागणी केली. अगदी मुंबई पोलिसांच्या अधिकृत खात्यानेही सुरुवातीला या व्हायरल पोस्ट्सवर विश्वास ठेवून 'एक्स' (पूर्वीच ट्विटर) वर मुंबई सरकारी रेल्वे पोलिसांना तपासासाठी टॅग केलं. मात्र लवकरच रेल्वेप्रेमी आणि तथ्य पडताळणी करणाऱ्या खात्यांनी या व्हिडिओतील काही महत्त्वाच्या तपशीलांकडे लक्ष वेधलं.

दरम्यान, महिलेने दगडफेक का केली आणि काही कारवाई झाली की नाही याबाबत अजून माहिती अद्याप मिळालेली नाही.

काय आहे सत्य?

व्हायरल व्हिडिओ नीट बघितल्यास तो मुंबईतील लोकलचा नसल्याचं स्पष्ट होतं. या व्हिडिओतील सर्वात महत्त्वाचा धागा म्हणजे लोकलच्या पुढच्या भागाचे डिझाईन. लोकलचा पुढील भाग, अर्थात मोटरमनचे केबिन नीट बघितल्यास ती मुंबईतील पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे विभागातील लोकल गाड्यांसारखा नाही हे समजते. याउलट, त्या लोकलवर ''एफ' अशी खूण दिसते, जी ईस्टर्न रेल्वेची (पूर्व रेल्वे) असून ही लोकल प्रामुख्याने पश्चिम बंगाल आणि शेजारच्या राज्यांत धावते. उपलब्ध पुराव्यांवरून हा व्हिडिओ ईस्टर्न रेल्वे नेटवर्कअंतर्गत येणाऱ्या भागातील असल्याचं स्पष्ट होतं. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी अद्याप घटनेचं नेमकं ठिकाण जाहीर केलेलं नाही, मात्र व्हायरल पोस्टला उत्तर देताना, ''हे प्रकरण संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आले आहे,'' असे उत्तर दिले असून असून ईस्टर्न रेल्वेच्या आरपीएफने हावडा आणि सियालदाह स्थानकांच्या आरपीएफला टॅग केलं आहे.

सूर्य मावळताच सुरू पावसाचं थरारनाट्य



मुंबई। हवामान विभागाच्या पूवार्नुमानानुसार मागील २४ तासांमध्ये राज्याच्या बहुतांश भागांमध्ये सायंकाळी अचानक पावसाळी वातावरण पाहायला मिळालं. कुठे सोसाट्याचा वारा सुटला, कुठे ढगाळ वातावरणानं धडकी भरवली, तर कुठे विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होत पावसानं हजेरी लावली. अशा या वातावरणाचं चित्र येत्या २४ तासांमध्येही कायम राहणार असून, राज्यात प्रामुख्यानं मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाच्या मुंबई शाखेकडून वर्तवण्यात आलेल्या अंदाजानुसार कोकणापासून थेट गोव्यापर्यंत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पुढील २४ तासांमध्ये पावसाची हजेरी असेल. तर, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात मात्र हवामान कोरडं राहणार असून पहाटेच्या तापमानात घट नोंदवण्यात येईल. यादरम्यान वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किमी इतका असेल. तर, काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. बहुतांश जिल्ह्यांमध्ये दिवस मावळतीला गेल्यानंतर पावसाचं हे थरारनाट्य सुरू होईल असाही प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. एकिकडे मान्सूनच्या परतीच्या चर्चा असतानाच दुसरीकडे पावसानं हजेरी लावणं म्हणजे नेमकं काय समजावं? हाच प्रश्न अनेकांच्या मनात घर करत असताना आता त्यामागची कारणंही समोर आली आहेत. अरबी समुद्राच्या आग्नेयेला लक्षद्वीप, केरळ, कर्नाटकचा दक्षिम भाग इथं कमी दाबाचं क्षेत्र तयार होणार असून, त्यामुळं ही प्रणाली राज्यातील पावसास कारणीभूत ठरत असल्याचं म्हटलं जात आहे. अरबी समुद्रातील ही प्रणाली सरत नाही, तोच बंगालच्या उपसागरामज्येही नव्यानं कमी दाबाचा पट्टा सक्रिय होत असल्या कारणानं आता दिवाळीच्या आठवड्यात या प्रणालीमुळं पावसाच्या सरी बरसणार का? हाच चिंतातूर करणारा प्रश्न उभा राहत आहे.



दिवाळी विशेष

दिवाळीत लक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी वास्तुनुसार दारावर लावा तोरण

सनातन धर्मात भगवान गणेश आणि देवी महालक्ष्मीच्या आनंदाचा सण म्हणजे आश्विन अमावास्येला ला साजारा होणार सण दिवाळी. भगवान श्री विष्णूंच्या प्रिय असणाऱ्या महालक्ष्मीच्या स्वागतासाठीची तयारी बऱ्याच दिवसा पूर्वी सुरू होते. घर आणि व्यावसायिक संस्थान, कार्यालयाची स्वच्छता, रंग-रंगोटी केली जाते. त्या नंतर आपल्या घराला सजविण्याचे काम सुरू होते. दिवाळीवर देवी लक्ष्मीच्या स्वागतासाठी विविध प्रकाराचे तोरण मुख्य दारावर लावले जातात. जर आपण वास्तुच्या काही नियमांना लक्षात ठेवून रंग आणि दिशेनुसार तोरण बांधले, तर ते आपल्याला शुभ आणि चांगली फळ देतात आणि आनंद, यश आणि समृद्धी आपल्या जीवनात दार ठोठावते.

*** तोरणाने आनंद येईल**

मुख्य दारावर बांधल्या जाणाऱ्या तोरणाला बंधनवार असे ही म्हणतात. देवी लक्ष्मीच्या स्वागतासाठी आणि देवी आईला प्रसन्न करण्यासाठी दारावर हे बांधणे शुभ मानतात. हे बांधल्याने घरात सकारात्मक ऊर्जा येते. तोरण आपण ताज्या फुलांचे, प्लॅस्टिकच्या फुलांचे किंवा धातूचे देखील बनवू शकता. आजकाल बाजारपेठेत वेगवेगळ्या रंगाचे आणि डिझाइनचे तोरण मिळतात. तोरणांची निवड घराच्या दिशेनुसार, रंग आणि आकार लक्षात घेऊन लावल्याने नशीब वाढतं.

*** पूर्वीकडे घराचे मुख्य दार असल्यास**

जर आपल्या घराचे दार पूर्वमुखी असल्यास तर हिरव्या रंगाचे फुलांचे आणि पानाचे तोरण लावणं सुख आणि समृद्धीला आमंत्रण देत. या दिशेत ताज्या आंब्याच्या आणि अशोकाच्या पानाचे तोरण लावल्यानं सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो आणि लक्ष्मीची कृपा मिळते.

*** उत्तरेकडे घराचे मुख्य दार असल्यास**

धनाची दिशा उत्तरेच्या मुख्य दारासाठी निळे किंवा आकाशी रंगांच्या फुलांचे तोरण लावावे. जर आपल्याकडे ताजे फुले नसल्यास आपण प्लस्टिकच्या फुलांचा वापर करू शकता. पण लक्षात ठेवा की फुले आणि पाने तुटलेले किंवा घाणेरडे नसावे. हे नेहमीच नकारात्मकता वाढवतात.

*** दक्षिणेकडे घराचे मुख्य दार असल्यास**

जर घराचे मुख्य प्रवेश दार दक्षिणेकडे असल्यास तर लाल, नारंगी किंवा याचा सम रंगाने असलेले तोरण बांधावे. असे केल्याने घरात धनागमन होत आणि मान सन्मानात वाढ होते.

*** पश्चिमेकडे घराचे मुख्य दार असल्यास**

घराचे मुख्य दार पश्चिमेकडे असल्यास मुख्य दारासाठी पिवळे, सोनेरी किंवा फिकट निळ्या रंगाच्या फुलांचे तोरण दारावर लावणं लाभ आणि प्रगतीस मदत करतं. लक्षात ठेवा की पूर्वी आणि दक्षिणे कडे असणाऱ्या दारावर कोणत्याही धातूचे तोरण लावू नये. पश्चिम आणि उत्तरे कडील दारावर धातूंचे तोरण लावू शकतो. अशा प्रकारे उत्तर, पूर्व आणि दक्षिण दिशेत बनलेल्या प्रवेश दारावर लाकडाचे तोरण लावू शकतो, पण पश्चिम दिशेला लाकडाचे तोरण लावणे टाळावे.

दीपोत्सव

मोठ्या उत्साहाने साजरा करताना सामाजिक जाणीवांचे भान आपण एक जबाबदार नागरिक म्हणून नेहमीच ठेवायला हवे. फटाक्यांची आतषबाजी करताना ध्वनीची तीव्रता किती प्रमाणात वाढते याचा कधी आपण विचारच करत नाही. ध्वनी व वायू प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा तोल बिघडतो व फार मोठ्या संकटास आपण आमंत्रण देतो.

दिवाळीच्या आनंदी वातावरणाची मजा लुटताना थोडेसे सुरक्षिततेचे भानही ठेवायला हवे. या दीपावलीत उत्साहाच्या भरात अपघात होऊ शकतो. आनंदावर विरजण पडते आणि त्याचे दुष्परिणाम कायम स्वरुपाचे होऊ शकतात.

पालकांनी मुलांसोबत राहावे

कमी आवाजाच्या तीव्रतेच्या आणि शोभेच्या फटाक्यांचा वापर करावा. तसेच ते राहत्या घरापासून दूर मोकळ्या मैदानावर लावावेत. लहान मुले फटाके लावत असताना मोठ्या माणसाने तेथे उभे असणे आवश्यक आहे. एवढी दक्षता प्रत्येकाने सामाजिक जबाबदारी म्हणून घेतली तरी ध्वनी वायू प्रदूषण आपण थोड्याफार प्रमाणात रोखू शकतो. पैसे खर्च करुन बहिरेपणा, अस्थमा, रक्तदाब, खोकला, घशाचे विकार अशा प्रकारची विकतची दुखणी का बरे घ्यावीत? दीपावली ही दिव्यांची असते, आवाजाची नसते तो दीपोत्सव आहे.

फटाक्यांच्या गुणवत्तेकडेही लक्ष द्या-

तिमिराकडून तेजाकडे नेणारा तसेच दुष्प्रवृतींचा नाश हा खरा या सणाचा उद्देश आहे. पण संपूर्ण वातावरणात मिसळलेला जीवघेणा धूर, धूळ आणि कानाचे पडदे फाडणारे कर्णकर्कश आवाज करणार्या फटाक्यांची आतषबाजी करुन हा सण साजरा करण्याचा मार्ग कुठला हे कळत नाही. आवाज न करणार्या फुलबाजी, सुरसुर्या, टिकल्या, अनार हे लखलखीत प्रकाश देणार्या फटाके वाजविणे हे एकवेळ समजू शकते, पण फटाक्यांचा तोफा डागणे हे मात्र आपण टाळलेच पाहिजे.



दिवाळीत फटाके उडवताना चुकूनही करू नका या चुका

दिवाळीत मातीचेच दिवे का लावले जातात कारण याचा संबंध ग्रहांशीही असतो

हिंदू धर्मात दिवाळी या पाच दिवसीय सणाला विशेष महत्त्व आहे. धनत्रयोदशीच्या दिवसापासून दिवाळी सुरू होते. या दिवशी देवी लक्ष्मी आणि गणपतीची पूजा विधीनुसार केली जाते. या दिवशी लोक नवीन कपडे परिधान करतात आणि इतर देवतांसह भगवान लक्ष्मीची पूजा करतात आणि संपूर्ण घर दिवे आणि रांगोळीने सजवतात, त्यानंतर एकमेकांना मिठाई देखील वाटली जाते.

दिवाळी हा हिंदू धर्माचा सर्वात मोठा सण कार्तिक महिन्यातील अमावास्येला साजरा केला जातो. या दिवशी लोक आपले घर मातीच्या दिव्यांनी पूर्णपणे सजवतात. पण तुम्ही कधी दिवाळीला फक्त मातीचे दिवे का लावले जातात यामागचे खरे कारण जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे का?, जाणून घेऊया दिवाळीला फक्त मातीचे दिवे का लावले जातात.

दिवाळी साजरी करण्यामागील कारण


पौराणिक मान्यतेनुसार, १४ वर्षांचा वनवास संपवून प्रभू राम अयोध्येत परतले, त्यानिमित्त शहरातील लोकांनी दिवे लावून आणि रांगोळी काढून त्यांचे जल्लोषात स्वागत केले. या दिवशी संपूर्ण अयोध्या शहर दिव्यांनी उजळून निघाले होते. तेव्हापासून कार्तिक महिन्यातील अमावास्येला दिवाळीचा सण साजरा केला जाऊ लागला. या दिवशी देवी लक्ष्मीसोबतच संपत्तीची देवी, श्रीगणेश आणि देवी सरस्वती यांचीही पूजा केली जाते.

दिवाळीत मातीचे दिवे का लावले जातात?

मातीचे दिवे लावण्यामागे अनेक कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे ज्योतिष शास्त्रानुसार मंगळ हा माती आणि जमीनीचा कारक मानला जातो. मोहरीचे तेल शनि ग्रहाशी संबंधित आहे. यामुळेच माती आणि मोहरीच्या तेलाचे दिवे लावून मंगळ आणि शनि दोन्ही बलवान होतात. ज्यामुळे शुभ फल मिळते. जर एखाद्या व्यक्तीचे मंगळ आणि शनि बलवान असतील तर त्याला धन, संपत्ती, सुख आणि वैवाहिक जीवनात सर्व सुख प्राप्त होते.

तणाव होतो दूर

मातीचे दिवे लावल्याने सकारात्मक उर्जा संचारते जी जीवनात आनंद टिकवून ठेवते. मातीचा दिवा हा पंच तत्वांचा निरूपण मानला जातो. खरे तर सर्व काही मातीच्या दिव्यात सापडते. दिवे हे माती आणि पाण्यापासून बनवली जाते. ते जाळण्यासाठी अग्नि लागते आणि हवेमुळे आग लागते. त्यामुळेच दिवाळीच्या शुभमुहूर्तावर फक्त मातीचे दिवे लावले जातात.



हे मंदिर वर्षभरात फक्त दिवाळीलाच उघडते, पत्र लिहून मागितली जाते इच्छा



दिवाळीचे पर्व जवळ येत आहे. दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. अनेक जण दिवाळीमध्ये फिरायला जातात. याकरिता आज आपण भारतातील अश्या एका मंदिराबद्दल जाणून घेणार आहोत जे फक्त वर्षभरातून एकदाच दिवाळीमध्ये उघडले जाते.

भारतातील कर्नाटक राज्यातील बेंगळुरू पासून १८० किमी अंतरावर हसनंबा मंदिर आहे. जे देवीला समर्पित आहे.हे मंदिर फक्त दिवाळीमध्येच आठवडाभर उघडण्यात येते. तसेच दीप प्रज्वलित करून वर्षभरासाठी बंद करण्यात येते. तसेच आश्चर्याची बाब म्हणजे हसनंबा मंदिर भारतातील एक मात्र असे मंदिर आहे, जे फक्त दिवाळीमध्ये उघडते.

इतिहास-

हे मंदिर १२ व्या शतकात बांधण्यात आले आहे. तसेच ८२३ वर्ष प्राचीन हे मंदिर परत येणाऱ्या दिवाळीला उघडले जाईल. या मंदिरातील देवीआईच्या दर्शनासाठी दुरदुरून भक्त दर्शनासाठी येतात. तसेच हे एक चमत्कारिक मंदिर आहे असे सांगण्यात येते. भक्त इथे पत्र लिहून इच्छा मागतात व त्यांच्या इच्छा देवीआई पूर्ण करते.

देशातील हे पहिले मंदिर आहे. जिथे भक्त देवी आईला पत्र लिहून आपली इच्छा व्यक्त करतात. दिवाळीच्या पर्वावर मोठ्या संख्येने भक्तगण इथे दर्शनासाठी पोहचतात. यामंदिरात देवीला फक्त तांदळाचा नैवेद्य दाखवण्यात येतो.



पौराणिक आख्यायिका-

या मंदिराची पौराणिक आख्यायिका आहे की, अंधकासुर या राक्षसाने ब्रह्मदेवाकडून अदृश्य होण्याचे वरदान मागितले होते. यानंतर त्याने पृथ्वीतलावावर अत्याचार करण्यास सुरुवात केली. त्यानंतर भगवान शिवाने त्याला मारण्याचा निर्णय घेतला. ज्या वेळी भगवान शिवाने अंधकासुराचा वध करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याच्या शरीरातून रक्ताच्या थेंबाने तो राक्षस पुन्हा जिवंत व्हायचा. शेवटी शिवाने आपल्या सामर्थ्याने योगेश्वरी देवीची निर्मिती करून राक्षसाचा संहार केला.

हसनंबा मंदिर कसे जावे?

हसनंबा मंदिरापासून जवळचे एयरपोर्ट बेंगळुरू एयरपोर्ट आहे. तिथून कॅब करून नक्कीच मंदिरापर्यंत पोहचता येते. तसेच बेंगळुरू रेल्वे स्टेशनवरून देखील हसनंबा मंदिर पर्यंत पोहचता येते. तसेच हे मंदिर म्हैसूर आणि हुबळीपासून देखील जवळ आहे.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार,२१ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २०२५

संपादकीय

कृतघ्न आणि असंवेदनशील महाराष्ट्र



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



भयंकर पुरामुळे मराठवाडा उद्ध्वस्त झाला असताना राज्य आणि सत्ताधारी मात्र असंवेदनशीलपणे गप्प बसले आहेत. शेतकऱ्यांची पिकं कुजली, घरे उद्ध्वस्त झाली, पंचनामेही झाले नाहीत. ऊसतोड कामगार आणि महिलांच्या वेदनांकडे कोणी पाहत नाही. महाराष्ट्राची संवेदना हरवली आहे.

दुष्काळी मराठवाड्याला 'न भूतो न भविष्यती' अशा परतीच्या पावसाने भयंकर झोडपले. सलग तीन दिवस सुरू असलेला पाऊस तेरा तास तर ढग फुटल्यासारखा पडत होता आणि घराघरात, शेतात पाणी भरत होते. जे तब्बल महिन्याभरानंतर आजही शेतातून हटलेले नाही. हाता-तोंडाशी आलेले सगळे सोयाबीनचे, कडधान्याचे पीक शेतात आता कुजून गेले आहे. कशीबशी जनावरे आणि माणसांचा जीव वाचला आहे, कित्येक लाख हेक्टर जमीन पुढची तीन वर्षे कसताच येणार नाही एवढ्या वाईट परिस्थितीमध्ये पुरात बरबाद झाली आहे. मुळातच सततच्या दुष्काळामुळे आणि विकासात मराठवाडा मुक्तीसंग्राम होऊ नये. महाराष्ट्रात सतत दुजाभाव शोषणारा हा प्रदेश सातत्याने गरिबीने पोळलेला आहे. अशा या भागाला पुरासारख्या भयंकर आपत्तीने यावर्षी नेस्तनाबूत केले आहे.

एरव्ही कुठेही अशी आपत्ती आली असती, तर तिथे अख्खा महाराष्ट्र धावत सुटला असता. परंतु इथे कोणताही उद्योग नाही. इथली शेती तशी कोणाच्याच खिसगणतीत नाही. दहा लाखांहून अधिक आठ महिन्यांसाठी गरिबीमुळे आणि दुष्काळामुळे ग्रासलेला इथला दहा एकराचा मालक शेतकरी ऊसतोड कामगार बनून पश्चिम महाराष्ट्रात, गुजरातमध्ये आणि कर्नाटकात ऊसतोडीसाठी जातो. कामगार म्हणून तो असंघटित आहे. ठेकेदार आणि साखर कारखान्याने वर्षानुवर्ष यांचे शोषण केले आहे. त्यामुळे त्यांचे घरदार पाण्यात बुडले काय आणि त्यांची शेती मातीमोल झाली काय? त्याचं कोणालाच काही इथे सोयरसुतक नाही; सरकारलाही नाही. कारण ते राजकीयदृष्ट्या म्हणावे तसे सक्षम पद्धतीने सरकारवर दबाव निर्माण करून आपल्या मागण्या कधीच मांडू शकले नाहीत. आता तर त्यांचे कंबरडेच मोडले आहे. सत्ताधाऱ्यांना मताची चोरी करून सत्ता मिळवायचे कळले आहे आणि विरोधक असून नसल्यासारखे आहेत. प्रशासक भ्रष्टाचारामध्ये गुंतले आहेत. सामाजिक संस्थांना एफसीआरए मिळणार नाही आणि कुठूनही ते पैसा आणून मराठवाड्याची मदत करू शकणार नाहीत, याची व्यवस्था सत्ताधाऱ्यांनी आधीच करून ठेवली आहे. जगण्याची लढाई एवढी अवघड आहे. ती संघटितपणे एकत्र येऊन आपला लढा उभारावा एवढी समज आणि उमेद इथल्या समाजात राहिलेली नाही. तब्बल महिना उलटून गेला तरी अजून इथले पंचनामे झालेले नाहीत. जमिनीच्या पंचनाम्याला तलाठी दुरूनच येऊन गेला असे महिला सांगत आहेत. घराचा पंचनामा कोणी केलेलाच नाही. दोन महिने झाले, मिळणारे मोफत रेशनही अजून मिळालेले नाही. कसेबसे रेशन कार्ड, मतदान कार्ड, आभा कार्ड, आयुष्मान कार्ड उराशी बाळगून आपल्या जनावरांना घेऊन सुरक्षित ठिकाणी पुरापासून स्वतःचा बचाव करणाऱ्या एकल महिला 'पर्याय' संस्थेच्या प्रांगणात एकत्र जमून आम्ही नेलेली तशी तुटपुंजीच असलेली परंतु सहवेदना व्यक्त करणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातील आमच्या हितचिंतकांनी आणि कार्यकर्त्यांनी दिलेली मदत आम्ही वाटत होतो. एका बाजूला त्यांची कहाणी ऐकून प्रचंड चिड येत होती, तर दुसऱ्या बाजूला त्यांचं दुःख पाहून डोळ्यांमध्ये अश्रू जमा होत होते. मराठवाडा म्हणून, पुरुष म्हणून, कामगार म्हणून, शेतकरी म्हणून अडचणी मोठ्याच आहेत, पण त्याहीपेक्षा महिला म्हणून, शेतकरी म्हणून, शेतमजूर म्हणून, ऊसतोडीचे कामगार म्हणून असणारी अडचण त्याहून अधिक आहे आणि ज्या एनडीआरएफचा हवाला देऊन इथे दुष्काळात आणि पुरात, भूकंपात सरकारी मदत दिली जाते किंवा देण्याचा आव आणला जातो त्यांच्या तथाकथित स्टँडर्ड ऑपरेटिव्ह गाईडलाइन्समध्ये 'जेंडर इक्वल रिस्पॉन्स' असा शब्द सोडल्यास एकल महिलांचा प्रश्न कसा हाताळला जाईल याविषयी सविस्तर मार्गदर्शन नाही. गरोदर माता, विधवा, परित्यक्ता महिला, स्तनदा माता, ज्येष्ठ महिला यांचे म्हणून काही वेगळे प्रश्न आणि अडचणी असू शकतात हे एनडीआरएफ यांच्या धोरणाचा भाग नाही. थोड्याफार थेरॉटिकल गोष्टी सोडल्या, तर प्रॅक्टिकली मराठवाड्याला तर एनडीआरएफ म्हणजे काय हे सांगण्यापासून सुरुवात आहे, असे जाणवले. बदललेल्या वातावरणातील बदलाचा मराठवाडा हा पहिला बळी ठरला आहे. राजकीय पुढाऱ्यांपैकी कोणीही लोकांमध्ये उतरून तिथली परिस्थिती समजून घेताना दिसले नाहीत. काही सन्माननीय अपवाद वगळता प्रशासक, शासक किंवा स्वयंसेवी संस्था यांचा संचार मराठवाड्यातील गावागावांमध्ये पाहायला मिळाला नाही. तीन हजारांहून अधिक गाव आणि कित्येक लाख हेक्टर जमिनीची संपूर्ण महाराष्ट्रात वाताहात झालेली असताना महाराष्ट्राला त्याचे काही देणेघेणे राहिलेले नाही. सर्वच पक्षातील पुढाऱ्यांचे साखर कारखाने आहेत आणि या कारखान्यांमध्ये मराठवाड्यातून ऊसतोडीसाठी कामगार आल्याशिवाय यांचे पानही हलत नाही; असे असून देखील साखर कारखान्याने आणि यांच्या जिल्हा सहकारी बँकांनी या ऊसतोड कामगारांसाठी आणि त्यांच्या भागातील त्यांच्या शेतीसाठी आणि घरासाठी कोणतीही तातडीची मदत देऊ केलेली दिसत नाही. सकाळी उठल्यानंतर ज्या साखरेचा चहा पिऊन यांच्या दिवसाची सुरुवात होते ती साखर मराठवाड्यासाठी दिवसेंदिवस अधिक कडू होते आहे; आयुष्याचे कडवट घोट घेत आहे. परंतु पश्चिम महाराष्ट्र मात्र असंवेदनशीलपणे तीच साखर वापरून आता दिवाळी साजरी करेल. धर्म, जातीचे, भाषेचे मुद्दे काढले की, महाराष्ट्रभर एकवटणारा मराठी माणूस मराठवाडा खोल खोल चिखलात रुतत असताना इतका कृतघ्न आणि असंवेदनशील का बनला आहे याचा शोध घ्यावा लागेल. स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारा महाराष्ट्र स्वतःची ओळख हरवून बसला आहे. वैचारिक दिवाळखोरीत निघालेल्या राजकीय पक्ष आणि भ्रष्टाचाराने नेस्तनाबूत झालेले येथील प्रशासन आणि धर्म-जातीच्या आणि भाषेच्या भानगडीत स्वतःचा स्वाभिमान हरवून बसलेला इथला जनसामान्य दिवसेंदिवस अधिकच असंवेदनशील होताना दिसतो आहे, महाराष्ट्राची चिंता वाटते आहे. वर्षानुवर्ष दुष्काळ शोषणारा मराठवाडा या भयंकर पुरातूनही शेतमजूर म्हणून मोठ्या संख्येने देशभर काबाडकष्ट करण्यासाठी बाहेर पडेल आणि पुन्हा एकदा आयुष्यात उभे राहील, परंतु या कठीण काळामध्ये महाराष्ट्रधर्म सांभाळला गेला नाही आणि मराठवाडा खोल चिखलात रुतत असताना महाराष्ट्र दिवाळी साजरी करत होता याची इतिहासात नोंद होईल; ती महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी असेल. भूकंप आला किंवा पूर आला, दुष्काळ पडला तरी रबराच्या बाहुलीसारखी पुन्हा पुन्हा उभी राहणारी येथील स्त्री मराठवाड्यात देखील उभी राहील. एकट्याने उभी राहील. दुसऱ्याच्या पडवीला तीन दगडाची चूल मांडून आलेल्या मदतीतील बाजरीच्या पिठाची भाकरी आणि पिठलं करून ती भुकेल्यांना खाऊ घालेल. ती हरणार नाही, परंतु तिला एकटीने लढायला भाग पाडणाऱ्या या शिवाजी महाराजांच्या तथाकथित मावळ्यांचं काय करायचं? आंतरराष्ट्रीय, आंतरराज्य कामगारांच्या स्थलांतराच्या संदर्भातले धोरण देशांत आहे. परंतु राज्यांतर्गत दहा लाखांहून अधिक ऊस तोडणाऱ्या कामगारांचे होणाऱ्या स्थलांतराच्या संदर्भात कोणतेही धोरण तथाकथित पुरोगामी महाराष्ट्राने अजून आखलेले नाही. मराठवाडा सातत्याने दुष्काळी आणि नापिकीमुळे त्रासलेला राहिला, विकासाच्या प्रक्रियेत मागे राहिला त्यामुळेच मराठवाड्यातील दहा लाखांहून अधिक शेतकरी असणाऱ्या लोकांना शेतमजूर म्हणून राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये ऊसतोड कामगार म्हणून कंत्राटी पद्धतीने आठ-आठ महिने गाव सोडून स्थलांतरित व्हावे लागते. त्यांच्या संदर्भातल्या सर्व प्रकारच्या मानवाधिकारांचे, अनेक कामगार अधिकारांचे उल्लंघन वर्षानुवर्षे या राज्यात होत आले आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक अंदाजपत्रकाहून अधिक म्हणजे दीडपट अधिक बजेट असणाऱ्या साखर आयुक्त आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या विविध साखर कारखान्यांचा संपूर्ण राजकारण आणि अर्थकारण हे या ऊसतोड कामगारांच्या कष्टावर उभे राहिले आहे. आता तीन हजारांहून अधिक गावे पुराने बाधित झालेल्या या मराठवाड्यातील लाखो शेतमजूर, ऊसतोड कामगारांचे जीवन अधिकच अडचणीत आले असताना या राजकीय वरदहस्त लाभलेल्या साखर आयुक्तालय, कामगार आयुक्तालय आणि साखर कारखाने यांना या ऊसतोड कामगारांशी काहीही देणेघेणे नाही, हे भयावह वास्तव आहे. अत्यंतिक कृतघ्न असणारे हे साखर कारखानदार आणि त्यांचे आयुक्तालय शोषणाची सरकारमान्य व्यवस्थाच आहे. मानवाधिकारांच्या उल्लंघनासाठी यांच्यावर खरे तर फौजदारी गुन्हे दाखल होण्याची गरज आहे.

आरटीई प्रवेशात पालकांची कोंडी

आरटीईमुळे गरीब मुलांना आठवीपर्यंत मोफत शिक्षण मिळते, पण नववीचे प्रवेश शुल्क (रु. १.५ ते दोन लाख) ऐकून पालकांना मोठा धक्का बसतो. या गंभीर समस्येवर त्वरित तोडगा काढण्यासाठी सरकारने पाऊल उचलणे गरजेचे आहे.



शिक्षण हक्क कायद्यामुळे (आरटीई) पहिली ते आठवीपर्यंतच्या मुलांना मोफत शिक्षणाची संधी मिळाली आहे. मात्र, जेव्हा नववीच्या वर्गाचे शुल्क समोर येते, तेव्हा पालकांना भोवळ आल्यासारखं होतं. चांगल्या दर्जाचे शिक्षण देणाऱ्या शाळा पालकांकडून एका वर्षाचे दोन ते तीन लाख रुपयांपर्यंत शुल्क आकारत आहेत. यामुळे गरीब पालकांची मोठी आर्थिक कोंडी होत आहे.

केंद्र सरकारने २००९ मध्ये हा शिक्षण हक्क कायदा (आरटीई) आणला, जो १ एप्रिल २०१० पासून देशभरात लागू झाला. या कायद्यामुळे सहा ते १४ वयोगटातील, म्हणजेच पहिली ते आठवीपर्यंतच्या गरीब आणि वंचित मुलांना उत्कृष्ट दर्जाचे प्राथमिक शिक्षण मिळवण्याचा हक्क मिळाला. आरटीई प्रवेशासाठी शाळांमध्ये २५ टक्के जागा आरक्षित ठेवल्या जातात, ज्यामुळे गरीब घटकांतील विद्यार्थ्यांना राज्य मंडळ, आयसीएसई आणि सीबीएसई मंडळांच्या शाळांमध्ये प्रवेश मिळतो. मात्र, अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या अनुदानित किंवा विनाअनुदानित शाळा आरटीई कायद्याची अंमलबजावणी करत नसल्यामुळे, राज्यातील लाखो मुलांना चांगल्या शाळांमधील प्रवेशापासून वंचित राहावे लागत आहे.

राज्यात आरटीई प्रवेशासाठी दरवर्षी तीन लाखांहून अधिक विद्यार्थी अर्ज करतात. पण राज्यात केवळ एक लाख जागा उपलब्ध असल्याने, जवळपास दोन लाख मुलांना दर्जेदार शिक्षणाच्या लाभापासून मुकावे लागत आहे.

आरटीईनुसार प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पहिली ते आठवीपर्यंत मोफत शिक्षण देणे बंधनकारक आहे. या विद्यार्थ्यांचे शुल्क शिक्षण विभाग भरते. मात्र, हे अनुदान शाळांना वेळेवर मिळत नसल्यामुळे शाळा पालकांना वेठीस धरतात आणि त्यांच्याकडून शुल्काची मागणी करतात. पहिली ते आठवी मोफत असल्याने पालक आपल्या मुलांना आरटीईतून प्रवेश घेतात. पण, आठवीचे वर्ष संपण्यापूर्वीच शाळा पालकांना सांगतात की, नववीच्या वर्गासाठी शुल्क भरावे लागेल. हे शुल्क ऐकून पालकांचे डोळे पांढरे होतात. नववीतील प्रवेशासाठी शाळा दीड ते दोन लाख रुपये शुल्क भरण्यास सांगतात. त्यामुळे पालकांची झोप उडते. इतके शुल्क भरणे शक्य नसल्यामुळे, अखेरीस मुलांना जिल्हा परिषदेच्या किंवा महानगरपालिकेच्या शाळेत प्रवेश घेण्याची वेळ येते.

पहिली ते आठवीपर्यंत चांगल्या शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना नववी आणि दहावीचे शिक्षण मात्र कठीण परिस्थितीत पूर्ण करावे लागते. नववीसाठी घराजवळ शाळा उपलब्ध नसेल, तर पालकांना कर्ज काढून मुलांना आहे त्या शाळेत शिकवावे लागते. किंवा मग, काही पालक मुलांचे शिक्षण थांबवण्याचा विचार करतात. यामुळे आरटीईतून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांसमोर नववी-दहावीच्या शिक्षणाचा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. विशेष म्हणजे, पहिली ते आठवीपर्यंत मोफत शिक्षण मिळत असल्यामुळे अनेक श्रीमंत लोकही कायद्याचा दुरुपयोग करून आपल्या मुलांना आरटीई प्रवेशातून प्रवेश मिळवतात. अशा पालकांवर शिक्षण विभागाने वेळेत कारवाई करणे गरजेचे आहे. आरटीई कायद्यांतर्गत सहा ते १४ वयोगटातील मुलांना मोफत प्रवेश मिळतो. पण कायद्यात शून्य ते १७ अशी तरतूद नसल्यामुळे ज्युनिअर-सीनिअर केजी, तसेच नववी-दहावीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक अडचणी येतात. मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे, असे मत शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व्यक्त करत आहेत.

गेल्या काही वर्षांत राज्यातील अनुदानित शाळा मोठ्या प्रमाणात बंद पडू लागल्या आहेत, ही चिंतेची बाब आहे. याउलट, स्वयंअर्थसहाय्यित शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे प्राथमिक शिक्षण देण्याबाबत पालकांसमोर पेच निर्माण झाला आहे. यात गरीब मुले शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जाण्याची भीती आहे. अनुदानित शाळा टिकवून ठेवण्यासाठी सरकारने आणि पर्यायाने पालकांनीही प्रयत्न करणे गरजेचे आहे. पालकच मुलांना विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश देत असल्याने अनुदानित शाळा बंद पडत आहेत, तर विनाअनुदानित शाळांना 'सुगीचे दिवस' आले आहेत. भविष्यात विद्यार्थ्यांअभावी अनुदानित शाळा बंद झाल्यास, गरीब मुलांचे शिक्षणाचे दरवाजे कायमचे बंद होऊ शकतात.

ज्युनिअर-सीनिअर केजीपासूनच शिक्षणासाठी पालकांना मोठा आर्थिक भार सोसावा लागतो. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिक्षणासाठी तर लाखो रुपये खर्च येतो. त्यामुळे उच्च शिक्षण गरीब विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे आणि गरीब विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर जात आहेत.

आरटीईनुसार सहा ते १४ वयोगटातील मुलांना मोफत प्रवेश मिळतो, पण नववी-दहावीच्या दोन वर्षांसाठी पालकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. पालकांसमोरचा हा पेच शिक्षण विभागाने वेळेत सोडवणे आवश्यक आहे. त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची तेवढीच गरज आहे, अन्यथा आरटीईनुसार प्रवेश घेणाऱ्या पालकांची ही लूट कधीच थांबणार नाही.

आणखी एका देशात 'जेन झी'द्वारे सत्तांतर

नेपाळपाठोपाठ तब्बल चार देशांमध्ये 'जेन झी' रस्त्यावर उतरले. ह्याजेन झीह्चे नेमके म्हणणे काय आहे? सत्ताधाऱ्यांना खाली खेचणे हाच त्यांचा उद्देश आहे की अन्य? यातून जगाने कोणता धडा घ्यायचा?

आफ्रिका खंडातील मादागास्कर या द्विपावर मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. मादागास्करचे राष्ट्रपती अँद्री रजोएलिना यांनी १४ ऑक्टोबर रोजी एका आदेशाद्वारे संसद बरखास्त केली. कारण, त्यांच्याविरोधात महाभियोगाचा प्रस्ताव आणला जाणार होता; मात्र, संतप्त संसद सदस्यांनी बहुमताने रजोएलिना यांच्यावरील महाभियोग मंजूर केला. यामुळे देशात दुहेरी सत्तासंघर्ष निर्माण झाला. राष्ट्रपती विरुद्ध संसद. अर्थात याचे अन्य पडसादही उमटले. लष्कराच्या 'कॅपसॅट' या विशेष विभागाने तडकाफडकी सत्ता ताब्यात घेतली. कॅपसॅट प्रमुख कर्नल मायकेल रँड्रियनिरीना म्हणाले की, देशात तात्पुरते प्रशासन स्थापन केले जाईल आणि नंतर पुन्हा नागरी सरकारकडे सत्ता दिली जाईल. मादागास्करमधील ही उलथापालथ अचानक झालेली नाही. 'जेन झी' (तरुणांनी)ने चालवलेले मोठे आंदोलन त्यास कारणीभूत आहे. देशात वीज आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा खंडित झाल्याने तरुण अस्वस्थ झाले. किमान रोज लागणाऱ्या सुविधाही मिळत नसल्याने त्यांचा संताप झाला. त्यातच देशामध्ये भ्रष्टाचार, बेरोजगारी, महागाई यासह अन्य प्रश्नही उग्र झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. हळूहळू त्याची तीव्रता वाढत गेली. पोलिसांनी दडपशाही सुरू केली. पाठोपाठ लष्करातील काही युनिट्सनी आदेश पाळण्यास नकार देऊन तरुणांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. हजारो तरुण रस्त्यावर उतरले. याचदरम्यान हिंसक आंदोलनात २२ तरुणांचा मृत्यू झाला. लष्कराच्या कॅपसॅटने संसद, निवडणूक आयोग आणि घटनाबाह्य संस्थांचे अधिकार स्थगित केले आणि राष्ट्रपतींच्या विरोधात सत्ता हस्तगत केली. कर्नल रँड्रियनिरीना यांनी जाहीर केले की, ''देशात पुन्हा स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी आम्ही हस्तक्षेप केला आहे. दोन वर्षांत आम्ही नवीन संविधान तयार करू आणि नागरी शासनाकडे सत्ता परत देऊ.'' आफ्रिकेत अलीकडच्या लष्करी बंडांच्या मालिकेत आणखी एक भर पडली आहे. तरुण पिढीच्या असंतोषातून उद्भवलेले हे बंड राजकीय प्रणालीतील खोलवरच्या समस्या दाखवत आहे. नजीकच्या काळात तेथे लोकशाही पुनर्स्थापना शक्य होईल का, हा मोठा प्रश्न आहे. मादागास्कर द्विपावरील आंदोलन केवळ स्थानिक असंतोषाचे द्योतक नाही, तर ते नव्या पिढीच्या विचारांचे प्रतिबिंब आहे. देशातील राजकीय अस्थैर्य, भ्रष्टाचार आणि मूलभूत सुविधा न मिळाल्यामुळे निर्माण झालेला संताप प्रदर्शित करतो. राजधानी अंतानानारिवो आणि संपूर्ण देश अस्थिर झाले आहे. 'जेन झी मादागास्कर' या तरुणांच्या संघटनेने सोशल मीडियाच्या माध्यमातून आंदोलनाची धार वाढविली. अखेर सत्ताधाऱ्यांना खाली खेचण्यात आले. मात्र, लष्कराने सूत्रे हाती घेतल्याने आंदोलन यशस्वी झाले का? युवकांना अपेक्षित असलेला बदल घडला का? आर्थिक संकट, वाढती बेरोजगारी, शिक्षण व आरोग्य यांसारख्या क्षेत्रांतील ढासळती व्यवस्था, सत्ताधाऱ्यांची उदासीनता, तरुणाईच्या आशा-आकांक्षा यांचा एकत्रित परिणाम म्हणून या आंदोलनाची ठिणगी पडली. नेपाळ, श्रीलंका, केनिया अशा विविध देशात 'जेन झी' यांनी आक्रमक होत बदलाचा प्रारंभ केला आहे. त्यामुळे त्या देशांच्या राजकीय नकाशावर नवा अध्याय लिहिला जात आहे. या आंदोलनात जसा आशेचा किरण आहे तसेच धोकेही. एकीकडे, युवकांनी आपल्या हक्कांसाठी लढण्याचे धैर्य दाखवले. भ्रष्टाचारविरोधी लाट आणि सामाजिक न्यायाची मागणी यामुळे देशात लोकशाहीबद्दलची जागरूकता वाढली आहे. पण दुसरीकडे, सैन्याचा राजकारणात हस्तक्षेप हा धोक्याचा इशारा आहे. इतिहास सांगतो की, ज्या देशात सैन्य सत्तेत आले, तिथे लोकशाही पुन्हा रुजवणे कठीण झाले आहे. नेतृत्वाची उणीव, अस्पष्ट ध्येय आणि राजकीय शून्यता या गोष्टी भविष्यासाठी चिंताजनक आहेत. मादागास्कर समोरचा प्रश्न आता केवळ शासन बदलाचा नाही, तर व्यवस्था बदलाचा आहे. जर संक्रमणकाळात सैन्याने सत्ता जनतेकडे परत दिली, तर ही क्रांती सकारात्मक ठरू शकते. पण सत्तेची चव लागल्यावर सैन्य माघार घेईल का? देशातील न्यायसंस्था, निवडणूक आयोग आणि स्वतंत्र प्रसारमाध्यमे यांचा स्वायत्तपणा जपला गेला, तरच लोकशाहीचे मूळ टिकेल. नागरिकांनीही जबाबदार राहून शांततामय बदलाला साथ देणे आवश्यक आहे. मादागास्करमधील आंदोलन हे आजच्या जगातील नव्या प्रवृत्तीचे प्रतीक आहे. सत्ता आणि व्यवस्था यांना तरुणाई प्रश्न विचारत आहे. ही लाट फक्त आफ्रिकेतच नव्हे, तर जगभर पसरत आहे. मादागास्करमधील परिस्थिती सुयोग्यरीत्या हाताळली गेली तर तो लोकशाहीचा नवा अध्याय लिहू शकतो. परंतु जर सत्तेचा खेळ जुन्याच पद्धतीने सुरू राहिला, तर इतिहास पुन्हा तोच चक्राकार फिरताना दिसेल. जगभरात 'जेन झी' आंदोलनाची चर्चा सुरू आहे. १९९७ ते २००२ या काळात जन्मलेल्या तरुणाईला 'जेन झी' म्हटले जाते. हा जमाव सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समस्यांबद्दल संवेदनशील आहे. पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण यासारख्या सार्वजनिक सुविधांचा अभाव, बेरोजगारी आणि संधींची कमतरता, भ्रष्टाचार, अन्याय, महागाई, लोकशाही व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे प्रश्न तसेच सोशल मीडियाच्या मदतीने संघटन ही 'जेन झी'ची वैशिष्ट्ये आहेत. श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळमधील 'जेन झी'च्या आंदोलनाचा उद्रेक आणि तेथे घडलेले सत्तांतर जगाने पाहिले आहे. चतुःसूत्रीवर 'जेन झी'चा भर आहे. त्यात सोशल मीडियाचा रणांगण म्हणून वापर, अहिंसक पण ठाम भूमिका, लोकशाही मूल्यांची पुनर्स्थापनेची मागणी आणि जागतिक प्रेरणा व एकात्मता यांचा समावेश आहे. 'जेन झी' केवळ आंदोलक नाही तर ते सरकारवरील दबाव गट आणि बदलाचे सूत्रधार झाले आहेत. भारतातही 'जेन झी' आंदोलन सुरू आहे. सामाजिक न्याय व नागरिक स्वातंत्र्य, पर्यावरणीय चळवळी, डिजिटल स्वातंत्र्य, रोजगार व शिक्षणातील असमानता याविषयी ते सक्रिय आहेत. 'जेन झी' आंदोलनाकडे सर्वंकषरीत्या पहायला हवे. ही अशी पिढी आहे की, जिला हवे ते इन्स्टंट (तातडीने) मिळते. त्यामुळे त्यांच्याकडे संयमाचा अभाव आहे. यातूनच अघटित घडण्याची भीतीही आहे. 'जेन झी' यांच्या अपेक्षा आणि मागण्या वेगळ्या आहेत. त्या जाणून घेणे, त्यांची स्पंदने, विचार लक्षात घेणे आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर त्यांच्याकडे नवनवीन आयुधे उपलब्ध आहेत. 'जेन झी'ला वेसण घालण्यापेक्षा त्यांचा वापर विधायक कामासाठी होऊ शकतो. त्यांच्या चळवळींना योग्य दिशादर्शन आणि बळ द्यायला हवे. त्यांची वैचारिक बैठक पक्की करायला हवी. उथळ आणि तात्पुरत्या किंवा तत्कालिक उपायांऐवजी चिरकाल आणि शाश्वत बदलांवर जोर द्यायला हवा. 'जेन झी' हा समाजाचाच एक घटक आहेत. त्यामुळे त्यांच्यावर लक्ष ठेवणे आणि त्यांच्या घडामोडींचा अंदाज घेणे हे समाजानेही करायला हवे. जिथे ते चुकत असतील तेथे त्यांना योग्य ती समज देण्याची जबाबदारी समाजाकडेही आहे. केवळ सरकार, प्रशासन किंवा राजकारणी यांच्यावर सोपवून हे चालणार नाही. जबाबदारी प्रत्येक घटकाचीच आहे. जे चांगले आहे त्याचे कौतुक करणे, चूक असेल, तर ती सुधारणे आणि योग्य दिशेने जाण्यास भाग पाडणे हे सारे आव्हानच आहे. खासकरून आजच्या आधुनिक पिढीचे तर अधिकच. जगभरातील 'जेन झी' आंदोलनाच्या ठिणग्यांकडे एकत्रित पाहिले तर मोठी चळवळ निर्माण झाल्याचे दिसते. सर्वसामान्यांना खिजगणतीतही न धरणाऱ्या सत्ताधारी, हुकूमशहा, लष्करशहा आणि राजकारण्यांना सणसणीत चपराक लगावण्याची क्षमता 'जेन झी'मध्ये आहे. मात्र, या 'जेन झी'चा वापर कुणी करते आहे का? त्यांच्या डोक्यावर बंदूक ठेवून वेगळाच निशाणा लावला जात आहे का? त्यांना मोठे बळ देऊन विध्वंसक काही घडवले जात आहे का? त्यांना भडकवण्याचे उद्योग होत आहेत का? याचीही खातरजमा करायला हवी. अन्यथा नागरी वस्तीत आणि समाजात वावरणारे 'जेन झी' हे दहशतवाद्यांपेक्षाही स्फोटक ठरण्याची भीती नाकारता येत नाही.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार,२१ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २०२५

शिंदेंच्या होमपीचवर महायुतीत कोल्डवॉर?
ठाण्यात स्वबळाच्या बेटकुळ्या



ठाणे, महायुतीत ठाण्यावरुन कलह होण्याची शक्यता आहे. ठाणे महापालिकेत शिवसेनेनं स्वबळावर लढावं अशी मागणी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केल्याची माहिती समोर आलीय. खुद्द एकनाथ शिंदेंनी या मागणीवर नाराजी व्यक्त केलीये. तर भाजपनंही शिवसेनेला कानपिचक्या दिल्यात. शिवाय भाजपनंही ठाण्यात स्वबळाचा नारा दिलाय.

ठाणे महानगरपालिका निवडणुकांआधी महायुतीत कमालीचे विसंवादी सूर निर्माण झाल्याचं दिसतंय. ठाण्यातील शिवसेना नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांची संघटनात्मक निवडणुकीच्या पूर्व तयारीसाठी बैठक पार पडली. या बैठकीमध्ये भाजपबद्दल नाराजीचा पाढा वाचण्यात आला. भाजपचे पदाधिकारी शिवसेना नगरसेवक पदाधिकारी करत असलेल्या विकासकामांमध्ये अडथळे आणत असल्याच्या तक्रारी यावेळी करण्यात आल्या. ठाणे महापालिका स्वबळावर लढा, अशी मागणी नगरसेवक तसेच शिवसेना पदाधिकाऱ्यांनी खासदार नरेश मस्के यांच्याकडे केलीय. ठाण्यात शिवसेनेने एकला चलो रेचे संकेत दिल्यानंतर भाजपनंही लगेच इच्छुक उमेदवारांची बैठक घेतली. ठाणे भाजपच्या १८ मंडळातून ४१६ इच्छुकांनी या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला. या बैठकीत अबकी बार ७० पार, महापौर भाजपचाच होणार अशी भूमिका भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली.

गेल्या काही दिवसांमध्ये ठाण्यात भाजप आणि शिवसेनेत कलगीतुरा रंगला आहे. ठाण्यामध्ये वनमंत्री गणेश नाईक यांनी लक्ष घातलं असून शिंदे पिता पुत्रावर सडकून प्रहार सुरु केलाय. त्यातच आता या दोन्ही पक्षांनी एकला चलो रे चा नारा दिलाय. त्यामुळे शिंदेंच्या बालेकिल्ल्यातच महायुतीत मिठाचा खडा पडणार का याबाबत चर्चा रंगल्या आहेत.

मिठी नदी घोटाळा : सीईओ केतन कदमला न्यायालयाचा दणका... दुसऱ्यांदा फेटाळला जामीन

मुंबई । मिठी नदी स्वच्छता घोटाळ्याप्रकरणी व्हर्गो स्पेशालिटीज प्रा. लि. कंपनीचा सीईओ केतन कदमला न्यायालयाने दुसऱ्यांदा दणका दिला आहे. केतन कदमचा सत्र न्यायालयाने पुन्हा एकदा जामीन नाकारला आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. जी. शुक्ला यांनी हा निर्णय दिला असून केतन कदम घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

बीएमसीला तब्बल ६५ कोटींचे

न्यायालयाने स्पष्ट केले, की कदमने शेल कंपन्यांमार्फत संशयास्पद आर्थिक व्यवहार केले असून BMC अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून ठेक्यातून आर्थिक फायदा घेतल्याचे पुरावे आहेत. केतन कदम याने ठेकेदारांवर यंत्रसामग्री भाड्याने घेण्यासाठी दबाव टाकला. तसेच, टेंडरमध्ये विशिष्ट अटी घालून दर वाढवले. या कारणास्तव BMC ने केलेल्या मिठी नदी स्वच्छता कामांवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. तर, यामुळे BMC ला तब्बल ६५ कोटींचे नुकसान झाले आहे.

कदम संपूर्ण घोटाळ्याचा सूत्रधार

सरकारी पक्षाने न्यायालयास सांगितले, कदम संपूर्ण घोटाळ्याचा सूत्रधार आहे. बीएमसी अधिकाऱ्यांच्या दिल्ली आणि केरळ दौऱ्याचे हॉटेल व प्रवास खर्च कदमने उचलले. या खर्चांचे नियोजन अटी ठरवण्यापूर्वी केले गेले.

कदमविरोधात ठोस पुरावे नाहीत – बचावपक्ष

कदमच्या वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद केला की, FIR आणि आरोपपत्रातील आरोप फक्त गृहीतकांवर आधारित आहेत. टेंडरच्या अटी कदमच्या सूचनेवर घालण्यात आल्याचे ठोस पुरावे नाहीत. BMC ने यंत्रांच्या तांत्रिक तपशीलांचे समर्थन केले असले, तरी त्यांच्या किंमती आणि वापरावर प्रश्न उपस्थित आहेत. तसेच, या प्रकरणातील BMC अधिकारी अजून अटकेत नाहीत, असा दावा त्यांनी केला.

जामीन दिल्यास पुराव्यात छेडछाड

यावर न्यायालयाने नमूद केले, इतर आरोपींना अटक झालेली नाही. कदम प्रभावशील व्यक्ती असून तो जामिनावर बाहेर आल्यास पुराव्यांशी छेडछाड करू शकतो किंवा साक्षीदारांना धमकावू शकतो. म्हणून कदमला जामीन देणे शक्य नाही.

ठेकेदारांच्या पैशातून स्वतः साठी लाभ

सादर केलेल्या पुराव्यांवरून न्यायालयाने म्हटले की, व्हर्गो स्पेशालिटीज प्रा. लि. कंपनी कडून ६ कोटींची रक्कम मशीन खरेदीसाठी हस्तांतरित झाली होती, त्यापैकी २.४१ कोटी कदमच्या वैयक्तिक खात्यात जमा झाली. जरी कदमने ही रक्कम CEO म्हणून पगाराचा हिस्सा असल्याचा दावा केला, तरी वैध दस्तऐवज उपलब्ध नाहीत.



याशिवाय, लिलावकर्त्याने कदमच्या **Groupo Solution** आणि **Woder India** या शेल कंपन्यांच्या खात्यात विविध रकमा हस्तांतरित केल्या आहेत. न्यायालयाने म्हटले की, यावरून दिसते की कदमने इतर ठेकेदारांना दिलेल्या करारातून स्वतःसाठी आर्थिक लाभ मिळवला. पुढे न्यायालयाने स्पष्ट केले की, शेल कंपन्यांद्वारे झालेल्या गैरव्यवहाराचे पुरावे स्पष्ट असल्यामुळे केतन कदमला जामीन देणे योग्य नाही. प्रकरणातील तपास आणि पुढील कारवाई पुढील आदेशानुसार सुरु राहणार आहेत.

लोंढेचे अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त
महापालिका-पोलिसांची संयुक्त कारवाई



नाशिक। सातपूर परिसरातील गोळीबार प्रकरणी अटक केलेल्या आरपीआय आठवले गटाच्या जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे याच्या अनधिकृत बांधकामावर महापालिकेचा अखेर हातोडा पडला आहे. चार वर्षांपूर्वी नंदिनी नदीच्या पूररेषेत बांधण्यात आलेली ही अनधिकृत इमारत महापालिका आणि पोलिसांच्या संयुक्त कारवाईत जमीनदोस्त करण्यात आली.

शहरातील आयटीआय सिग्नल परिसरातील एका बारमध्ये खंडणी उकळवण्यासाठी गोळीबाराची घटना घडली होती, ज्यात एक जण गंभीर जखमी झाला. त्यावर खाजगी रुग्णालयात उपचार केले गेले.

या घटनेनंतर प्रकाश लोंढे यांचा मुलगा भूषण लोंढे आणि त्याचे काही साथीदार यांच्यावर गोळीबाराचा गुन्हा दाखल करण्यात आला, आणि नंतर लोंढे पिता-पुत्राच्या मुसक्या आवळण्यात आल्या.

लोंढेच्या इमारतीत भुयार आढळून आला, ज्यामध्ये शस्त्रास्त्रे आणि अलिशान बेडरूम असल्याचे निष्पन्न झाले. आता लोंढेच्या इमारतीचे पाडकाम झाल्यानंतर, परिसरातील झोपडपट्टीतील इतर अनधिकृत घरांनाही नोटीस पाठवून त्यावर देखील कारवाई सुरू करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

वसईत मीटरवर आधारित सेवा सुरू करण्यासाठी टॅक्सी, रिक्षा चालकांना १५ नोव्हेंबरपर्यंत मुदत



वसई। वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात १५ नोव्हेंबरपर्यंत टॅक्सी, रिक्षा चालकांना मीटरवर आधारित सेवा सुरू करण्यासाठी मुदत देण्यात येत आहे. या क्षेत्रात मीटरवर आधारित टॅक्सी, रिक्षा सेवा १५ नोव्हेंबरपासून सुरू करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. मंत्रालयात वसई-विरार महापालिका क्षेत्रातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत आयोजित बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक बोलत होते. बैठकीस वसईच्या आमदार स्नेहा दुबे, एस. टी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वसई-विरार महानगरपालिका आयुक्त मनोज सूर्यवंशी, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर आदी उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले, वसई झ विरार महानगरपालिका क्षेत्रात शेअर टॅक्सी सेवेला परवानगी आहे. टॅक्सी, रिक्षा चालकांनी प्रवाशांची लुबाडणूक करू नये, प्रवाशांच्या तक्रारी आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातून महामंडळाने ठाणे, कल्याण मार्गावर लांब पल्ल्याची बस सेवा सुरू करावी. प्रवाशी संख्या लक्षात घेता शहर बस वाहतूक पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावी. महापालिका क्षेत्रात असलेल्या महामंडळाच्या जागांचा पार्किंग जागांसाठी उपयोग करावा. यासाठी जागा लागल्यास महानगरपालिकेने जागेचे नियोजन करावे, असे निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले. वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या विरार, वसई, नालासोपारा येथे बस डेपो सुरू करावेत. नागरिकांना परिवहन सेवा सुलभरित्या मिळावी, याबाबत महानगरपालिकेने कार्यपद्धती ठरवून अंमलबजावणी करावी, असे निर्देशही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले.

पशुगणनेत एमबीएमसीचा ठाणे जिल्ह्यात प्रथम क्रमांक



भाईंदर। मिरा-भाईंदर महापालिकेने पशुगणनेत ठाणे जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. ठाणे जिल्ह्यात ६ महापालिका आणि २ नगरपरिषदांचा समावेश असून, त्यापैकी मिरा-भाईंदर महापालिकेने नियोजनबद्ध अंमलबजावणी, अचूक माहिती संकलन करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कामगिरीबद्दल महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी सबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. शासनाच्या निर्देशानुसार मिरा भाईंदर महापालिकेने डिसेंबर २०२४ मध्ये या सर्वेक्षण मोहिमेला सुरूवात केली होती. केवळ चार महिन्यांच्या कालावधीत एप्रिल २०२५ पर्यंत शंभर टक्के गणना पूर्ण करण्यात आली.

महापालिकेने ही गणना कोणत्याही बाहेरील संस्थेला न देता महापालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली. महापालिकेच्या आस्थापनेवरील ४७ संगणक चालक आणि ६ निरीक्षक यांच्या समन्वयातून ही पशू गणना करण्यात आली. या गणनेत शहरातील प्रत्येक वॉर्ड आणि विभागातील रस्त्यावरील प्राण्यांचा समावेश करण्यात आला. यामध्ये रस्त्यावरील श्वान, गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या आणि इतर पशुधनांची बारकाईने गणना करण्यात आली. यामुळे शहरातील पशूंचे वास्तव स्थितीचे अद्ययावत आणि विश्वसनीय डेटाबेस तयार करण्यात आला आहे,असे पालिकेकडून सांगण्यात आले आहे.या उपक्रमात महत्त्वाची भूमिका बजावर्णाया सर्व कर्मचार्यांना प्रोत्साहनपर मानधन म्हणून एकूण ३५ लाख रुपए रक्कम मंजूर करण्यात आले आहेत. आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, उपायुक्त डॉ. सचिन बांगर आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम निराटले यांच्या नियंत्रणाखाली ही संपूर्ण मोहीम पार पडली. आयुक्तांच्या निदेर्शानुसार येत्या दोन दिवसांत दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा करण्यात येणार आहे. ही कामगिरी मिरा-भाईंदर महापालिकेच्या प्रगतीशील आणि परिणामकारक प्रशासनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असून, भविष्यातील सर्व उपक्रमांसाठी प्रेरणादायी ठरणारी असल्याचे आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी सांगितले.

हर्बल हुक्क्याला परवानगी... कायद्याच्या चौकटीत राहूनच न्यायालयाचे राज्य सरकारला कारवाईचे निर्देश



याचिकाकर्त्यांचा दावा : हर्बल हुक्का पुरवणाऱ्या रेस्टॉरंट्सवर पोलिसांनी कारवाई करू नये, यासाठी दाखल करण्यात आलेल्या अनेक याचिका न्यायालयाने निकाली काढल्या. उच्च न्यायालयाच्या २०१९च्या आदेशानंतरही पोलीस अधिकाऱ्यांकडून जबरदस्तीने कारवाई केली जात असून, त्यामुळे व्यवसायात आर्थिक नुकसान आणि अडथळा निर्माण झाला आहे, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला.

मुंबई। हर्बल किंवा तंबाखूविरहित हुक्का पुरवणे कायदेशीर असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने २०१९ मध्ये दिलेल्या आदेशाची पुन्हा आठवण करून देत हर्बल हुक्कांना परवानगी असल्याचे स्पष्ट केले आणि राज्य सरकारला कायद्याच्या चौकटीत राहूनच कारवाई करण्याचे निर्देश दिले.

गुरुवारी न्यायमूर्ती रियाज छागला आणि फर्हान दुबाश यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित यंत्रणा तपासणी करू शकतात. जर हुक्का पार्लरमध्ये तंबाखूजन्य पदार्थ आढळले, तर संबंधित व्यक्तींवर कारवाई करता येईल, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

याचिकाकर्त्यांना रेस्टॉरंट चालवण्यास किंवा त्यांच्या म्हणण्यानुसार तंबाखू किंवा निकोटीन नसलेला हुक्का पुरवण्यास बंदी नाही, असे म्हणत न्यायालयाने स्पष्ट केले की, संबंधित यंत्रणांनी कोट्पाच्या तरतुदींनुसारच कठोर कारवाई करावी.

न्यायालयाने राज्य सरकारकडून सादर करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्राची नोंद घेतली. कोट्पा अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार फक्त सहाय्यक पोलीस निरीक्षक किंवा त्याहून वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच आहे. तसेच, हुक्का पार्लरमध्ये कोणतेही अमली पदार्थ दिले जात असल्याचे आढळल्यास, संबंधित कायद्यांनुसार कारवाई करता येईल.

राजेंद्र राठोड आणि ध्रुव बी. जैन या वकिलांमार्फत याचिकाकर्त्यांनी ऑगस्टमध्ये न्यायालयात धाव घेतली होती.

परभणीत अल्पवयीन मुलीला पोटदुखी, आई-वडिलांनी डॉक्टरकडे नेलं, अन्

परभणी। शहरात अल्पवयीन तरुणीसोबत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मागील काही दिवसांपासून सतत पोट दुखत असल्याचं अल्पवयीन मुलीने आपल्या आई-वडिलांना सांगितलं. घरची परिस्थिती बेताची असल्याने मजुरी करणाऱ्या आई-वडिलांनी आपल्या मुलीला थेट परभणीच्या जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांकडे तपासणीसाठी दाखल केलं. डॉक्टरांनी तपासल्यानंतर आई-वडिलांच्या पायाखालची जमिनच सरकली.

ही अल्पवयीन मुलगी गर्भवती असल्याचं समोर आलं. त्यानंतर मुलीसोबत घडलेला प्रकार तिच्या आई-वडिलांचा सांगितला. मुलीने घरी माहिती दिल्यानंतर तिच्या आई-वडिलांनी अत्याचार केलेल्या तरुणाला फोन केला. मात्र मुलीसह तिच्या आई-वडिलांना त्याने जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मुलीच्या आईने थेट पोलीस ठाणे गाठत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचं नाव ओम बालाजी पुरी, वय २३ वर्ष, असून तो तरुण देखील त्याच गावातील रहिवासी आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परभणीच्या पूर्णा तालुक्यातील एका गावात मजुरी करणाऱ्या कुटुंबातील मुलीसोबत हा प्रकार घडला. गावातीलच तरुणाने अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं. त्यानंतर तिच्यावर सतत लैंगिक अत्याचार केले. मी तुज्यावर प्रेम करतो, मी तुज्यासोबत लग्न करणार आहे असं म्हणत या अल्पवयीन मुलीला त्याने गाफील ठेवलं. याच दरम्यान काही दिवसांपासून अल्पवयीन मुलीच्या पोटात खूप दुखू लागलं. गावापासून जवळ असलेल्या डॉक्टरांना दाखवण्यात आलं. मात्र तरीही मुलीचं पोट दुखणं थांबत नव्हतं. त्यानंतर डॉक्टरांनी परभणीच्या शासकीय जिल्हा रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला.

आई-वडिलांनी आपल्या अल्पवयीन मुलीला परभणीच्या जिल्हा रुग्णालयात दाखल केलं. उपचारादरम्यान डॉक्टरांच्या अल्पवयीन मुलगी गर्भवती असल्याची बाब लक्षात आली. त्यांनी हा प्रकार मुलीच्या आई-वडिलांना सांगितला आणि त्यांच्या पायाखालची जमिनीच सरकली.

विरारमध्ये लाच स्विकारताना महावितरणच्या वायरमनला रंगेहाथ अटक

विरार। नालासोपारा येथील वायरमनला पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. राजेश रामप्रसाद सरोज (४५) असे या कर्मचार्याचे नाव आहे. अर्जदाराच्या तक्रारीवरून ही कारवाई केली असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सांगण्यात आले आहे. नालासोपारा पूर्वेकडील बिलालपाडा परिसरात मोठ्या प्रमाणात वीज चोरीच्या घटना वाढत चालल्या आहेत. या वीज चोरी करणार्या नागरिकांच्या विरोधात प्रशासनाकडून कारवाईची चाल ढकल केली जात असते. तर काही अधिकारी या ग्राहकांकडून वारंवार पैसे घेत असल्याचे नागरिकांनी बोलताना सांगितले. याच पार्श्वभूमीवर एका तक्रारदाराच्या घरातील वीज देयक थकीत असल्याने तेथे कार्यरत असलेले वायरमन राजेश सरोज यांनी वीज जोडणी खंडित केली होती. त्यानंतर तक्रारदार यांनी थकीत वीजदेयक भरणा करून पुन्हा वीज जोडणी करण्यासाठी सरोज यांना सांगितले होते. सरोज यांनी वीज जोडणीसाठी ६० हजार रुपयांची मागणी केली होती.

परंतु तडजोडी नंतर ४० हजार रुपये लाच मागितली. याप्रकरणी पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून चाळीस हजारांची लाच स्वीकारताना महावितरणच्या कर्मचार्यायाला गुरुवारी दुपारी दीड सुमारास रंगेहाथ पकडले आहे. याप्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक दादाराम कारंडे, पोलीस हवालदार नवनाथ भगत, पोलीस अंमलदार आकाश लोहोरे, जितेंद्र गवळे त्यांच्या पथकाने केली आहे. भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास किंवा लाच मागर्ण्याया लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आले आहे.

लग्न नव्हे फसवणूक!!! अहिल्यानगरमध्ये बनावट नवरी, लग्नाच्या पहिल्याच रात्री लाखो रुपये घेऊन फरार



अहिल्यानगर। अविवाहित तरुणांना लग्नाचं आमिष दाखवून लाखो रुपये उकळणाऱ्या एका हाय-प्रोफाइल टोळीचा कोपरगाव पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. माहेगाव (ता. कोपरगाव) येथील एका तरुणाला जालना येथील रोशनी अशोक पवार नावाच्या 'बनावट नवरी'सोबत लग्न लावून देत या टोळीने त्याच्याकडून तब्बल सव्वा दोन लाख रुपये उकळले. लग्नाच्या पहिल्याच रात्रीच्या पहाटे नवरीने पळ काढल्यानं, तरुणाला आपली फसवणूक झाल्याचं लक्षात आलं. याप्रकरणी 'बनावट नवरी'सह पाच आरोपींविरुद्ध कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, मुख्य आरोपी महिलेला पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे. कोपरगाव तालुक्यातील माहेगाव येथील एका अविवाहित तरुणाला लग्नासाठी मध्यस्थांमार्फत एक तरुणी दाखवण्यात आली. ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान चर्चा आणि हे लग्न पार पडले आणि तरुणाकडून मध्यस्थांनी सव्वा दोन लाख रुपये घेतले. मात्र, लग्नाच्या पहिल्याच रात्रीच्या, पहाटेच्या सुमारास 'नवरी' घरातून पसार झाली. सकाळी फसवणूक झाल्याचं लक्षात येताच, तरुण आणि त्याच्या कुटुंबीयांनी मध्यस्थांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण संपर्क होऊ शकला नाही. अखेर तरुणाने कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर येथील आरोपी महिला ज्योती राजू गायकवाड ही १६ ऑक्टोबर रोजी कोपरगावात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. कोपरगाव तालुका पोलिसांनी सापळा रचून मोठ्या शिताफीने ज्योती राजू गायकवाड हिला ताब्यात घेतलं. याच रात्री तिच्यासह, बनावट नवरी आणि तीन पुरुष साथीदारांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपी महिलेला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या गंभीर गुन्ह्याचा पुढील तपास कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक वैशाली मुकणे करीत आहेत. इतर फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.'अविवाहित तरुणांनो लग्नाचं आमिष दाखवून होणाऱ्या फसवणुकीपासून स्वतःचा बचाव करा! मागील काही वर्षांपासून अविवाहित तरुणांना लग्नाचे खोटे आमिष दाखवून त्यांची आर्थिक फसवणूक करण्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. केवळ पैसे उकळण्यासाठी काही टोळ्या सक्रिय झाल्या आहेत.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com